पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १७

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०६/२०२०** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **सोमवार** दिनांक **०८/०६/२०२०** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव - सभापती**
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
४. मा.बाबर शर्मिला राजू
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) आरक्षणे PPP अथवा Acomodation तत्वावर विकसित करणेबाबत – मा.कैलास बारणे , मा.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) सर्व धर्मिय समाजाच्या नागरिकांसाठी दफनभूमी उपलब्ध करुन देणेबाबत. – मा.सुनिता तापकीर , मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) “मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या योजनेअंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात प्रशिक्षण योजना राबविणेबाबत. – मा.सुनिता तापकीर ,मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१३/०५/२०२०** (कार्यपत्रिका क्रमांक **१६**) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०१

दिनांक – ०८/०६/२०२०

सुचक : मा.कैलास बारणे अनुमोदक : मा.वैशाली घोडेकर

मा.कैलास बारणे, मा.वैशाली घोडेकर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील ताब्यात आलेली सर्व आरक्षणे विकसित करण्याच्या दृष्टीने पी.पी.पी. तत्वावर अथवा ॲकोमोडेशन तत्वावर विकसित करण्याकरिता परिपूर्ण विचार करुन योग्य ते धोरण शहर सुधारणा समिती सभेपुढे मा.आयुक्त यांनी त्वारीत ठेवावे जेणेकरुन शहरातील आरक्षणे विकसित होतील व त्यावर अतिक्रमणे होणार नाहीत आणि शहराचा विकासही मनपा निधी खर्च न करता झपाटयाने होणार असल्याने याकामी धोरण निश्चित करुन मा.शहर सुधारणा समिती सभेपूढे सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०८/०६/२०२०

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांनी प्रस्तावित केलेनुसार थेरगाव भागातील हिंदू, मुस्लिम,ख्रिश्चन या समाजासाठी आवश्यक असलेल्या दफनभूमीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबीत आहे. या भागातील मुस्लिम समाजातील कुटूंबामध्ये एखादी मयत झालेस त्यास चिंचवड दफनभूमी मध्ये घेवून जावे लागते. त्या ठिकाणी जागा अपूरी असून तेथे खोदकाम करताना मानवी सांगाडे व अवशेष सापडतात त्यामुळे अशा प्रकारे मुस्लिम समाजाची अवहेलना होताना दिसून येते. या भागातील मुस्लिम समाजाची लोकसंख्या प्रचंड असून या विषयाचा विचार करता या भागात दफनभूमी आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेप्रमाणे नागरिकांना राहत असलेल्या भागामध्ये अत्यंविधी करण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणेने उपाय योजना करणे गरजेचे आहे. तरी त्यानुसार थेरगाव भागात दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०८/०६/२०२०

सुचक : मा.सुनिता तापकीर अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांनी प्रस्तावित केलेनुसार"नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत महिला, मुले / मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यापैकी "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" ही एक प्रशिक्षण योजना आहे. या प्रशिक्षण योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय मध्ये समाविष्ट सर्व जाती व तत्सम पोटजाती जमाती यांनाच प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल. मागासवर्ग प्रवर्गातील युवक आणि युवतींचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने ही प्रशिक्षण योजना राबविण्याचा मानस आहे. "मागासवर्गीय

युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" ही प्रशिक्षण योजना मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ ही संस्था पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आहे व आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठ्या प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करून वस्तीपातळीवरील प्रशिक्षण देण्याचा या संस्थेला भरपूर अनुभव आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आय.टी.आय. मार्फत विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याचे काम चालते. सदरचे प्रशिक्षण हे आय.टी.आय. येथील प्रशिक्षण केंद्रात चालत असते. मात्र "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेअंतर्गतचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर द्यावयाचे आहे. त्यामुळे वस्तीपातळीवर प्रशिक्षण देण्यासाठी तयारी करणे, प्रशिक्षण निहाय आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करणे, सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक / प्रशिक्षिका यांची नेमणूक करणे, इतर आवश्यक मनुष्यबळ / कर्मचारी यांची नेमणूक करणे, त्यांचे मानधन ठरविणे इत्यादी प्रशासकीय व तांत्रिक कामकाज करणे हे त्यांच्या चालु कामाच्या व्यापाचा व तद्नुषंगीक बाबींचा विचार करता सदर योजनेची अंमलबजावणी आय.टी.आय. मार्फत तातडीने होणे शक्य नाही. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, तसेच निविदा पध्दतीने संस्था निवडीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधीचा विचार करता, व चालु वर्षाच्या कामासाठीचे संस्थेमार्फत प्रशिक्षणाचे सादर दरही रास्त असलेने प्रशिक्षणास इच्छुक असलेले कुठलेही युवक / युवती प्रशिक्षणापासून दिर्घ कालावधीमुळे वंचित राहू नये. त्यामुळे निविदा न मागविता थेट पध्दतीने "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकुण २५ विषयांचे प्रशिक्षण हे लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती), सोबतच्या "प्रपत्र-अ" मधील नमुद तपशिल व संस्थेमार्फत सादर अभ्यासक्रमानुसार व दरानुसार (सर्व करांसहित) चालुवर्षी दि. ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्र (पिं.चिं.मनपा.) यांचा अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करुन मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत यावी. संस्थेमार्फत विविध व्यवसाय प्रशिक्षणात सहभाग घेतलेल्या युवक / युवतींना रोजगार / स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे, त्यासंबंधीत व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्री पश्चात सेवा तसेच जमा खर्च नोंदी, आवश्यक परवानगी / दाखले इत्यादीबाबत त्यांना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील. या योजनेबाबत महापालिकेच्या धोरणानुसार लाभार्थ्यांकडुन आवश्यक ती कागदपत्रे घेण्यात यावी. मागासवर्गीय युवक / युवतींना (उत्पन्न गटाची अट न ठेवता) प्रशिक्षणास विषयानुरुप एकुण प्रशिक्षण शुल्काच्या (प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीची होणारी रक्कम रुपये) या रक्कमेच्या ९०% प्रमाणे होणारी रक्कम ही एकुण प्रशिक्षण शुल्क म्हणुन समजण्यात यावी व त्यानुसार प्रति लाभार्थी झालेल्या प्रशिक्षणाचे शुल्क संस्थेस अदा करणेत यावे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेचे आर्थिक हित साधले जाणार आहे. त्यामुळे निविदा न मागविता थेट पद्धतीने "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकूण २५ विषयांचे प्रशिक्षण हे सोबत जोडलेल्या 'प्रपत्र-अ' मधील नमुद तपशील व संस्थेमार्फत सादर होणाऱ्या अभ्यासक्रमानुसार व महानगरपालिका मान्य दरानुसार चालुवर्षी सन २०२०-२०२१ ह्या आर्थिकवर्षातील दिनांक ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्र (पिंपरी – चिंचवड महानगरपालिका ) यांचा मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचे मार्फत सादर प्रशिक्षण विषयांचे दर, अभ्यासक्रम, कालावधी इत्यादी बाबत अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - N.C.I.T (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचे मार्फत प्रशिक्षण देणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रशिक्षणातील इच्छुक मागासवर्गीय युवक व युवतींच्या मागणीनुसार २ तासांऐवजी त्यांचे मागणीनुसारच्या तासिकेत त्यांना प्रशिक्षण देणेत यावेत. चालु आर्थिक वर्षातील वर्षाआरंभी पासुनच योजनेचे काम चालु असणार असल्याने संस्थेवर होणाऱ्या कामाच्या ताणाचा विचार करता तसेच

मागासवर्गीय युवक व युवतींच्या वेळेअभावी त्यांना इतर पुरक विषयांच्या सलग्न प्रशिक्षणास प्रवृत्त करू नये. युवक व युवतींच्या मागणीनुसारच्या कालावधीत व वेळेत सदर प्रशिक्षणाचे आयोजन करणेत यावे. सदर योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील मागासवर्गीय युवक व युवतींच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ व्हावी, व्यवसाय करून त्यांचे आर्थिक उत्पन वाढावे, विविध व्यवसाय कलांमध्ये युवक व युवतींनी पारंगत होऊन त्यांचे दैनदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे. या प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या युवक व युवतींना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाजप्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी च्या हेतूने मागासवर्गीय युवक व युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण या योजने अंतर्गत विविध रोजगार / स्वरोजगार पूरक प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येत आहे. त्यामुळे प्रशिक्षित झालेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांचे उत्पन्न किती वाढेल, त्यांना रोजगार उपलब्ध झाले अथवा नाही या संबंधित तपासणीचे कामकाज योजनेच्या कामकाजात अंतर्भुत नसावे. विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान / कुवत / क्षमता असलेल्या गरजु युवक / युवतीच फाइल्स सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. त्यामुळे युवक / युवतींना त्यांचे इच्छेनुरुप प्रशिक्षणास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले / राहिले असे होणार नाही. केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळून येत नाही. त्यामुळे कुठलेही गरजु / इच्छुक युवक / युवती प्रशिक्षणापासून वंचित राहु नये, प्रशिक्षणात सहभागी करुन घेत नाही, अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही / विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता विविध व्यवसाय प्रशिक्षण राबविण्यास मान्यता देणेत यावी. यापूर्वी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीय महिला/मुली यांनी या योजनेअंतर्गत विविध प्रशिक्षण घेतलेले असले तरी “मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या योजनेमध्ये मागासवर्गीय महिला/मुली यांना सहभागी करुन घेणेस मान्यता देणेत यावी. युवक / युवतींना त्यांच्या मागणीनुसार एकापेक्षा अधिक विषयांचे प्रशिक्षण देणेस तसेच युवक/युवतींच्या इच्छेनुसार एखादे/तेच प्रशिक्षण परत देणेस मागासवर्ग प्रवर्गातील युवक आणि युवतींचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या हेतूने धोरण म्हणुन मान्यता देणेत यावी. प्रशिक्षण घेणेस युवक/युवतींना प्रोत्साहन मिळावे व प्रशिक्षण घेण्यासाठी आर्थिक कारण त्यांना बाधक होऊ नये यासाठी व कुठलीही इच्छुक युवक/युवती प्रशिक्षणापासून वंचित राहु नये या कल्याणकारी उद्देशास पूरक व सुसंगत धोरण असावे या उद्देशाने सदर योजने अंतर्गतच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणास इच्छुक युवक/युवतींकडून यापूर्वी मनपा अंतर्गत चालणाऱ्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या मंजूर धोरणाप्रमाणे प्रशिक्षण शुल्काच्या १०% प्रमाणे होणारी लाभार्थी सहभाग शुल्काची रक्कम मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांकडून स्वीकारण्यात येऊ नये. म्हणजेच युवक / युवतींना मोफत प्रशिक्षणास धोरण म्हणून मान्यता देणेत यावी. वस्तीपातळीवर योजनेचा सुयोग्य प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच युवक / युवतींना योजनेच्या अटी व शर्तीची स्पष्टपणे माहिती होणेसाठी चालुवर्षीच्या मान्यतेनुसार लाभार्थी पात्रता निकष (अटी व शर्ती) यामध्ये योग्य तो बदल करणेत यावा. प्रशिक्षणातील विलंब टाळण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षणाच्या विलंबाबतच्या कुठल्या ही तक्रारीस वाव राहु नये या हेतूने मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांना वस्तीपातळीवरून इच्छुक युवक/युवतीं यांच्या ३० युवक/युवतींच्या मर्यादेत त्यांच्या मार्फत फाइल्स सादर करून सहभागी करून घेणेस मान्यता देणेत यावी. ह्या प्रमाणे त्यांचे गट तयार करून गटांच्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीनुसारच्या कागदपत्रांच्या फाईल्स स्वीकारणेस मान्यता देणेत येत आहे. अशा प्रकारची सूचना प्रशासनाकडुन सदरील संस्थेस देण्यात यावी. चालु वर्षातील प्रशिक्षणाचा विचार करता होणाऱ्या प्रशिक्षणाची देयके ही चालु सदर योजनेसाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच वस्तीपातळीवरून ज्यांची मागणी असेल त्या सर्व मागासवर्गीय

युवक/युवतींच्या प्रशिक्षणाच्या गटनिहाय फाईल्स स्वीकारणेत याव्यात. सदर योजेनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करण्याचे/योजना अंमलबजावणी संबधित निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करून योजना राबविण्यासंबंधीतचे व सदर योजनेअंतर्गतची देयके अदा करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा. अतिरीक्त आयुक्त सो. यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या उपलेखाशिर्षावर सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या/होणाऱ्या तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत यावी. संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम ही संस्थेकडुन अनामत व लेखापरीक्षण पुर्ततेकामी म्हणून घेणेत यावी. तथापी सदर अनामत रक्कमेच्या तुलनेत जादा काम होणार असेल तर त्यानुसारच्या संभाव्य ज्यादा कामापोटीच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम संस्थेकडुन आगाऊ भरून घेण्यात यावी. सदरची होणारी अनामत रक्कम ही मोठी असल्याने संस्थेच्या मागणीचा व त्यांचे आर्थिक निकडीचा विचार करता चालु वर्षाचे काम पूर्ण झालेनंतर सदर रक्कमेपैकी ४% रक्कम ही संस्थेस त्वरीत परत करावी. मात्र उर्वरीत १% रक्कम हि मनपातील लेखापरीक्षणानंतर लेखापरीक्षणातील सर्व अक्षोपाधिन आक्षेप व वसुलपात्र आक्षेप याची १००% पुर्तता संस्थेमार्फत सादर झालेनंतर सदरची रक्कम संस्थेस परत देणेत यावी. तथापी याबाबत प्रशासकीय स्तरावर योग्य तो निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे. सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकामध्ये नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या उपलेखाशिर्षावर या कामासाठी निधी राखीव आहे. सदरील कामासाठी वाढीव निधीची गरज असलेस आवश्यक तो वाढीव निधी महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडील राखीव निधीच्या केलेल्या ५% तरतुदीमधून सक्षम समित्यांच्या मान्यतेने वर्ग करणेत याव्यात. स्थापत्य विभागाकडील राखीव निधीच्या केलेल्या तरतुदीमधून इतर अन्य विभागातील उपलेखाशिर्षाअंतर्गत केलेल्या तरतुदीमधुन चालुवर्षी मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेसाठी लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार रक्कमा वर्ग करणेस व त्यानुसार मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" योजना ही मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचेमार्फत सन २०२०-२०२१ साठी ह्या आर्थिकवर्षातील दिनांक ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण देणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

( विषय क्रमांक ३ लगतचे प्रपत्र – अ )

| अ.क्र | विषयाचे नाव | कार्यक्रम कालावधी दररोज २ तास | | प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क र.रु. | प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्कावर १८% प्रमाणे होणारी जीएसटीची र.रु. | एकुण प्रशिक्षण शुल्क (प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीच्या रक्कमेसह होणारी रक्कम) र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दिवस | तास | | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| १ | इंटेरिअर डिझाईन व डेकोरेशन प्रशिक्षण | ४५ दिवस | ९० तास | २६२५.०० | ४७२.५० | ३०९७.५० |
| २ | म्युरल पेंटींग प्रशिक्षण | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| ३ | लमासा आर्ट प्रशिक्षण | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| ४ | ज्युट बॅग मेकींग व बांबु आर्ट मेकींग प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | १६८५.०० | ३०३.३० | १९८८.३० |
| ५ | फोटो लॅमिनेशन व फ्रेमिंग प्रशिक्षण | २० दिवस | ४० तास | १३००.०० | २३४.०० | १५३४.०० |
| ६ | सॅनिटरी नॅपकीन प्रशिक्षण | १० दिवस | २० तास | ५५६.५० | १००.१७ | ६५६.६७ |
| ७ | बाल संगोपन प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | १६८५.०० | ३०३.३० | १९८८.३० |
| ८ | विमा सल्लागार प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | १६८५.०० | ३०३.३० | १९८८.३० |
| ९ | पोषक आहार व आरोग्य प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | १६८५.०० | ३०३.३० | १९८८.३० |
| १० | फ्रंट ऑफीस कम रिसेप्शनिस्ट प्रशिक्षण | ४५ दिवस | ९० तास | २८५०.०० | ५१३.०० | ३३६३.०० |
| ११ | ट्रॅव्हल व टुरिझम प्रतिनीधी प्रशिक्षण | ६० दिवस | १२० तास | ३४००.०० | ६१२.०० | ४०१२.०० |
| १२ | ऑनलाईन सर्व्हिसेस प्रशिक्षण | ३० दिवस | ६० तास | १९५०.०० | ३५१.०० | २३०१.०० |
| १३ | मेणबत्ती बनविणे (कॅन्डल मेकींग) | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| १४ | लाँड्री | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| १५ | सौंदर्य सल्लागार | ६० दिवस | १२० तास | ३९००.०० | ७०२.०० | ४६०२.०० |
| १६ | औद्योगिक सुरक्षा रक्षक | ३० दिवस | ६० तास | १९५०.०० | ३५१.०० | २३०१.०० |
| १७ | बेकरी उत्पादने | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| १८ | सॉफ्ट स्किल्स फॉर बेस लाइन स्टाफ | ३० दिवस | ६० तास | १६८५.०० | ३०३.३० | १९८८.३० |
| १९ | सहाय्यक फायर ऑपरेटर | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० |
| २० | गुणवत्ता निरीक्षक | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० |
| २१ | रेफ्रिजरेशन / एअर कंडिशनिंग मेकॅनिक | ३० दिवस | ६० तास | ३२२५.०० | ५८०.५० | ३८०५.५० |
| २२ | कागदी पिशव्या व कागदी पाकीट तयार करणे | १० दिवस | २० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| २३ | मूलभूत संगणक शिक्षण | ३० दिवस | ६० तास | २२५०.०० | ४०५.०० | २६५५.०० |
| २४ | इंटरनेट प्रशिक्षण | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |
| २५ | कापडी पिशव्या, मास्क व विविध प्रकारच्या बॅग तयार करणे | १५ दिवस | ३० तास | ८७५.०० | १५७.५० | १०३२.५० |

( विषय क्रमांक ३ चे लगत )

“ मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम " सन २०२०-२०२१

युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी इ. लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) :

१. युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी यांच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबाबतची पोच पावती (रहिवाशी प्रत) ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक

२. स्वत:, वडिलांचा अथवा जवळच्या नातेवाईकांच्या जातीचा पुरावा / वडिलांच्या जातीचा पुरावा उपलब्ध नसल्यास नातेवाईकाचे जात प्रमाणपत्र आणि नातेवाईकासोबतच्या नात्याचा तपशील देणारे मा. सक्षम प्राधिकारी यांचे पत्र / अर्जदार, अर्जदाराचे वडील अथवा आजोबांच्या प्राथमिक शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा / अर्जदार अथवा अर्जदाराच्या वडीलांचा शाळा सोडल्याचा दाखला /अर्जदार, अर्जदाराचे वडील अथवा जवळच्या नातेवाईकाचा जन्म नोंदवहीचा उतारा / अर्जदाराचे वडील अथवा जवळच्या नातेवाईकासाठी छाननी समितीने जारी केलेले वैधता प्रमाणपत्र / विवाहित महिला असल्यास आणि जातीचा दाखला/पुरावा विवाहापूर्वीच्या नावे असल्यास मा. सक्षम प्राधिकारी यांचे पत्र / मरारोहयो जॉब कार्ड इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ सादर करावे

३. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असणे अवश्वक

४. कुठल्याही उत्पन्न गटातील युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी इ. यांना सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होता येईल. मात्र त्यासाठी वय वर्ष १६ पूर्ण असणे आवश्यक

५. वास्तव्याच्या / वयाच्या पुराव्यार्थ युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी यांच्या नावे / नाव असलेले : आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत) / घरपट्टी (मिळकतकर) पावती / पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांचे झोपड्पट्टीधारक म्हणुन ओळखपत्र / मतदार ओळखपत्र / पॅनकार्ड / टेलिफोन बिल / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक / शिधापत्रिका / पारपत्र / वाहनचालक अनुज्ञप्ति / वीज देयक / पाणीपट्टी पावती / राष्ट्रीय स्वास्थ्य बीमा योजना कार्ड इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ सादर करावे लागेल

६. सदर प्रशिक्षणास इच्छुक महिला साक्षर असणे आवश्यक. त्यानुसार शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्यार्थ कुठलीही कागदपत्रे सादर करणेची अवश्यकता नाही

७. १५ ते ३० युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी या मर्यादेत प्रत्येक युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी यांच्या गटांनी गटप्रमुखामार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह (साक्षांकित सत्यप्रत) व प्रत्येक युवक / पुरुष / महिला / मुली / तृतीयपंथी यांच्या फोटोसह विहीत नमुन्यात फाईल सादर करणे आवश्यक

८. लग्नानंतरच्या किंवा इतर कारणास्तव नाव बदलाबाबतच्या पुराव्यार्थ पॅनकार्ड / लग्न पत्रिका / विवाह नोंदणी दाखला / रक्कम रुपये १००/- च्या मुद्रांक कागद (स्टॅम्प पेपर) वर केलेले प्रतिज्ञापत्र इत्यादी तत्सम कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत) पुराव्यार्थ सादर करावे लागेल.

( विषय क्रमांक ३ चे लगत )

**‘ कोविड-१९ ’ (कोरोनाव्हायरस) च्या पार्श्वभूमिवर**

**१.** प्रशिक्षणाचे ठिकाण संस्थेने रोज सॅनिटाईज करण्यात यावे.

**२.** सोशल डिस्टसींगचा नियम बंधनकारक असणार आहे.

**३.** प्रत्येक प्रशिक्षणार्थी/लाभार्थी यांना मोफत मास्क व सॅनिटायझर देण्यात यावे.

**४.** मा.केंद्र शासन , मा.राज्य शासन व महानगरपालिका यांच्या कोविड -१९ संदर्भातील अटी व शर्तीचे पालन प्रशिक्षण देताना संस्थेस बंधनकारक असणार आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( राजेंद्र किसनराव लांडगे )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१८६/२०२०
दिनांक : ०८/०६/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.